जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय,
पुरवठा विभाग

जा.क्रं.2017/पुरवठा/कक्ष-7-1/सिआर-04 दिनांक :- 28/11/2017.

## प्रसिध्दी पत्रक

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील उर्वरीत 11 अशासकीय सदस्यांच्या नियुक्ती बाबतचे प्रसिध्दीपत्रक

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्ती करणेबाबत शासन निर्णय क्रं. ग्रासप-1013/प्र.क्रं.-119/ग्रासं-2 दिनांक 19-10-2013 अन्वये अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई नुसार लातूर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर एकुण 28 अशासकीय सदस्यांची निवड करावयाची आहे. त्यापैकी एकुण 17 सदस्यांची निवड यापुर्वीच्या जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यांत येवून करण्यांत आलेली आहे उर्वरीत 11 अशासकीय सदस्यांच्या निवड करावयाची आहे त्यासाठीची समिती यापुर्वीप्रमाणेच गठीत करण्यांत आलेली आहे.

1. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
2. पोलिस अधिक्षक - सदस्य
3. जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष - सदस्य
4. जिल्हा पुरवठा अधिकारी - निमंत्रक

जिल्हा ग्राहक परिषदेवरील निवड करावयाचे प्रवर्गनिहाय अशासकीय सदस्यांच्या प्रवर्गनिहाय खालीलप्रमाणे आहे.

1. जिल्हा परिषदेचे दोन पेक्षा कमी नसतील इतके सदस्य. - 2
2. पंचायत समितीचे दोन पेक्षा कमी नसतील इतके सदस्य - 1
3. कृषी उत्पन्न बाजार समितीचे दोन पेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी- 2
4. वैधक व्यवसायांचे दोन पेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी- 2
5. व्यापार व उदयोग क्षेत्राचे दोन पेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी - 2
6. पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे दोन पेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी- 2

वरीलप्रमाणे प्रवर्गनिहाय निवड करावयाची जाहिरात ही जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचे संकेतस्थळावर www.latur.nic.in सविस्तर तपशीलासह प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. ईच्छूक उमेदवारांनी जाहिरातीच्या दिनांकापासून 30 दिवसाचे आत संबंधीत तहसिल कार्यालयात जाहीरातीत नमुद केलेला विहीत नमुन्यातील अर्ज तहसील कार्यालयात दाखल करणेबाबत आवाहन करण्यांत येत आहे. तसेच जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदावर अशासकीय सदस्यांची निवड वरील निवड समितीमार्फत करण्यांत येईल. निवड झालेल्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयातून निर्गमित केले जातील.

( )
जिल्हाधिकारी लातूर
तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती
जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद,
जिल्हा लातूर.